# येशु व त्याच्या शिष्यांनी सुवार्तेची घोषणा केली

मुलांना शिकविण्यासाठी **M2b** हा अभ्यास वाचावा,

येशूचे तारणदायी मरण व पुनरुत्थान आणि पश्चात्ताप करणाया विश्वासणायांना पापक्षमा करण्याचे व सार्वकालिक जीवन देण्याचे त्याने दिलेले अभिवचन या विषयीच्या अस्सल सुवार्तेची घोषणा ख्रिस्ती लोक करतात (लूक 24:46-48)

## 1. सुवार्तेची घोषणा करण्यासाठी तुमच्या अंत:करणाची तयारी करा.

उत्तम प्रकारे केलेल्या सुवार्ता प्रसारामुळे लोकांना आपली पापे पदरी घेऊन पश्चात्ताप करण्याची आणि येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवण्याची प्रेरणा मिळते. आपण लोकांना अस्सल-खरी सुवार्ता सांगतो तेव्हा पवित्र आत्मा त्यांना पश्चात्ताप करण्यास आणि विश्वास ठेवण्यास साहाय्य करतो.

येशूच्या द्वारे पापक्षमा आणि सार्वकालिक जीवन देणाया सुवार्तेचा संदेश चांगल्या प्रकारे आत्मसात करण्याकरीता पुढे दिलेले पवित्र शास्त्रातील शास्रपाठ काळजी पूर्वक वाचा.

**पाहा लूक 18:31-34 मध्ये** येशूने तो मरण्यापूर्वी आणि पुन्हा जिवंत होण्यापूर्वी स्वत:विषयी कोणते भाकित केले होते...

- तो कोठे मरण पावणार होता?
- परराष्ट्रीय लोक त्याचे काय करणार होते?
- तीन दिवसांनंतर येशू स्वत: काय करणार होता?

**पाहा लूक 24:5-9 मध्ये** दोन दूतांनी स्रियांना येशूविषयी काय सांगितले...

- पापी जनांनी त्याला काय केले.
- तो कसा मरण पावला.
- त्याने तीन दिवसांनंतर काय केले.

**पाहा लूक 24:36-48 मध्ये** येशूने त्याचे मरण आणि मरणातून पुन्हा जिवंत होणे यानंतर स्वत:विषयी काय भाकित केले...

- आपण खरोखर मरणातून पुन्हा जीवत झालो हे येशूने कशा प्रकारे दाखवले (वचने 36-43).
- त्याचे मरण आणि पुनरुत्थान याविषयी कोणत्या पवित्र पुस्तकात व पवित्र माणसांनी भाकित केले होते (44-45).
- दु:ख सहन केल्यानंतर तीन दिवसांनी त्याला स्वत:ला काय करायचे होते (46).
- आपण विश्वासणायांनी सर्व ठिकाणच्या लोकांना कशाची घोषणा करणे अगत्याचे आहे (47).
- हया गोष्टींच्या संबंधात येशूच्या शिष्यांनी काय करायचे आहे? (48).

**पाहा प्रे.कृ. 2:21-24 व 37-38 मध्ये** पेत्राने यहूदी लोकांना दिलेल्या संदेशात...सांगितले...ते शोधा

- येशूचे मरण व पुनरुत्थान याविषयी पेत्राने काय सांगितले? (2:21-24).
- पापांची क्षमा आणि पवित्र आत्मा मिळवण्यासाठी यहूदी लोकांनी काय करायला पाहिजे (2:37 व 38).

**पाहा प्रे.कृ. 26:19-23 मध्ये** पौलाने यहूदीतर लोकांना दिलेला संदेश...

- परराष्ट्रीयांनी (यहूदीतर लोक) काय करायचे आहे, (20). (तारण व्हावे) यासाठी यहूदी आणि परराष्ट्रीय अशा दोघांकडूनही देव पश्चातापाची अपेक्षा करतो).

- येशूचे मरण आणि पुनरुस्थान याविषयी (23).

**पाहा रोम 6:8-14 मध्ये** आपला बाप्तिस्मा झाला तेव्हा आध्यात्मिकदृष्टया आमचे काय झाले...

- ख्रिस्त मरण पावला तेव्हा त्याच्या बरोबर कोण मरण पावले?
- ख्रिस्त मरणातून पुन्हा उठाला तेव्हा त्याच्याबरोबर कोणाला उठवण्यात आले?

## 2. आठवडयात करावयाच्या गोष्टींची योजना सहका;ांशी चर्चा करुन ठरवा.

येशूच्या सामर्थ्याने आरोग्य मिळालेले किंवा सुटका झालेल्या विश्वास न ठेवणाफ्रयांची भेट घेऊन त्यांना सुवार्ता स्पष्ट करुन सांगा आणि सोबत रोम 5:10 व 10:9-10 मधील अभिवचनेही त्यांना सांगा.

तुम्ही आणि सहकारी कशा प्रकारे सुवार्ता स्पष्ट करुन सांगत आहात याबदद्दल त्यांच्याशी चर्चा करा. येशूला ठार मारले आणि तो पुन्हा जिवंत झाला तसेच लोकांनी त्यांचे जुने जीवन सोडून नव्या जीवनासाठी ख्रिस्तावर भरंवसा ठेवा याचीच घोषणा करण्याची योजना आखा.

चित्रांचा उपयोग करा. धार्मिक विषयांवरील चित्रे काढण्यास तुमच्या संस्कृतित परवानगी असेल तर साध्या-सोप्या चित्रांचा एक संच तयार करा. ही चित्रे येशूची सुवार्ता स्पष्ट करताना तुम्हांला लोकांना दाखवता येतील. वरील साधी चित्रे ही उदाहरणे आहेत.

निराश झालेल्या, मोह परीक्षेत पडलेल्या किंवा साशंक अशा बाप्तिस्मा घेतलेल्या विश्वासणाफ्रयांची भेट घ्या आणि नीतिमान जीवन जगण्यासाठी लागणारे ख्रिस्ताचे सामार्थ्य त्यांच्या ठायी आहे हे स्पष्ट करा. तुम्हांला रोम 6:1-14 ह्या शास्त्रभागाचा उपयोग करता येईल.

## 3. आगामी उपासनेसंबंधी सहकाूयांशी बोलून योजना आखा.

लोकांच्या गरजांनुसार कार्यक्रम निवडा.

येशूने मरणातून उठल्यावर आपल्या शिष्यांना दर्शन दिले याविषयी **सांगा** किंवा नाट्यीकरण करा आणि लूक 24 मध्ये (भाग 1) तुम्हांला काय आढळले ते स्पष्ट करा. तुम्हांला आढळलेल्या गोष्टींवर प्रश्न विचारा.

**मुलांनी** तयारी केलेली नाटिका, कविता आणि प्रश्न प्रौढांना विचारण्यास संधी द्या.

विश्वासणाफ्रयांना साधा पण सामर्थ्यशाली संदेश अविश्वासणाफ्रयांकडे घेऊन जाण्यास तयार करा. पुढे उदाहरण म्हणून काही चित्रांच्या खाली संदेश दिले आहेत.

### ''तुम्हांला दोन गोष्टी माहित असणे आणि दोन गोष्टी करणे आवश्यक आहे''

### माहित असणे

1) तुम्ही केलेल्या लाजिरवाण्या गोष्टींमुळे देव तुम्हांला नरकात पाठवील.
2) तुम्ही केलेल्या लाजिरवाण्या कृत्यांमुळे येशू आला आणि त्याने वधास्तंभावरचे मरण पत्करले तसेच तुमच्या पापांची क्षमा करण्यासाठी आणि आपले सार्वकालिक जीवन तुम्हांला देण्यासाठी तो मरणातून पुन्हा उठला.

### करा


1) तुमच्या लाजिरवाण्या कृत्यांचा तुम्हांला खेद वाटून त्यापासून मागे फिरणे अगत्याचे आहे.
2) तुम्हांला पापांची क्षमा करण्यासाठी मरणाूया आणि पुन्हा उठणाूया येशूवर तुम्ही विश्वास ठेवणे फार अगत्याचे आहे.

**प्रभुभोजनाची** ओळख करुन देण्यासाठी लूक 23:13-48 ह्या शास्त्रपाठातून येशूचे वधास्तंभावर खिळले जाणे हा वृत्तांत वाचून दाखवा किंवा सांगा.

पुढील गोष्टींसाठी विश्वासणाफ्रयांचे लहान गट करा.

- मित्रांचे व नातेवाईकांचे तारण व्हावे याकरीता प्रार्थना करा.
- त्यांना सुवार्ता उलगडून सांगण्याचा मार्ग कळवा याकरीता प्रार्थना करा.
- त्यांना केव्हा भेटायचे याची योजना आखा.
- लोकांनी दोन गोष्टी शिकणे व करणे अत्यंत आवश्यक आहे अशा गोष्टी पाठ करा (वर दिल्या प्रमाणे)


**पाठ करा लूक 24:46-48.**




येशू ह्या जगात मनुष्य म्हणून आला. त्याच्या जन्माची वेळ आणि ठिकाण ह्याविषयीचे अभिनव खूप पूर्वीच देऊन ठेवले होते.




येशूने सत्कृत्ये करुन, आजाफ्रयांना व अशुद्ध आत्म्याने पछाडलेल्यांना आरोग्य देऊन आणि मृतांना पुन्हा जिवंत करुन अभिवचनाने देऊ केलेला तोच आहे हे दाखवले. तसेच देवाची ओळख कशी करून घ्यायची हेही त्याने शिकवले.



दुष्ट धार्मिक पुढाफ्रयांनी येशूवर दोषारोप केले आणि दुष्ट वृत्तीच्या अविश्वासणाफ्रयांनी त्याला लाकडाच्या वधास्तंभावर खिळून ठार मारले.



अधिकाफ्रयांनी येशूच्या मित्रांना त्याला कबरेमध्ये पुरण्यास परवानगी दिली. रोमन राज्यपालाने लोकांना दूर ठेवण्यासाठी सैनिकांचा पाहारा ठेवला.



तीन दिवसांनंतर येशू मरणातून पुन्हा उठला आणि अनेक लोकांना दर्शन दिले. त्याने सर्व ठिकाणच्या लोकांना सांगितले त्यांनी आपले मार्ग बदलावेत, त्यांच्या सर्व वाईट कृत्यांची क्षमा होण्यासाठी त्याच्यावर विश्वास ठेवा आणि त्यांना त्याचे स्वत:चे सार्वकालिक जीवन तो देणार आहे.

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net